POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३४१ ● मुंबई, शनिवार, १२ जुलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा धमाका

## बेडरुम, पैशांनी भरलेली बॅग, संजय शिरसाटांच्या व्हिडीओने खळबळ

**दरम्यान, संजय शिरसाट हे या आधी कोणत्या प्रकरणांमुळे अडचणीत आलेत ते पाहुयात,**

- शिरसाटांकडून संभाजीनगरातील वीट्स हॉटेलच्या खरेदीत अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला. मुळात हॉटेलची किंमत १०० कोटी पेक्षा जास्त असताना शिरसाटांसाठी लिलावात किंमत कमी दाखवल्याचा विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आरोप केला. कंपनी लिलावात सहभागी होण्यास पत्र नसल्याचाही दावा त्यांनी केला होता.
- शेंद्रा एमआयडीसी मूळ जमिनीचा हेतू ट्रक टर्मिनससाठी आरक्षित जागा होती. मात्र आरक्षण बदलून संजय शिरसाट यांनी मुलाच्या नावे जमीन विकत घेतल्याचा आरोप करण्यात आला.
- छत्रपती संभाजीनगर शहरालगत वर्ग २ ची जमीन नियमबाह्य खरेदी केल्याचा आरोप संजय शिरसाटांवर आहे. कोट्यवधीची जमीन कवडीमोल किमतीत घेतल्याचा इम्तियाज जलील यांचा आरोप आहे.
- शहरातील मुख्य रस्ता असलेल्या जालना रोडवरील जमीन शिरसाटांनी अत्यंत कमी किमतीत खरेदी केल्याचा आरोप माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केला आहे.
- मुलगा सिद्धांत शिरसाट यांच्यावर एका विवाहित महिलेने गंभीर आरोप केले. सिद्धांतने मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला. नंतर त्या महिलेने ते आरोप मागे घेतले. हे आमचं पर्सनल मॅटर असल्याचं तिने स्पष्टीकरण दिलं होतं.

**■मुंबई। प्रतिनिधी :**

महायुतीचे मंत्री संजय शिरसाट यांना आयकर विभागाची नोटीस आली आहे. यानंतर आता संजय शिरसाट यांचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी हा व्हिडीओ दाखवला आहे. या व्हिडीओत संजय शिरसाट यांच्याकडे असलेल्या बॅगेत नोटांचे बंडल पाहायला मिळत आहे. त्यामुळे आता चर्चांना उधाण आले आहे.

**व्हिडीओत नेमकं काय?**

या व्हिडीओत संजय शिरसाट हे आपल्या बेडरूममध्ये बसलेले आहेत. त्यांच्या बाजूला एका बॅगेत नोटांचे बंडल स्पष्टपणे दिसत आहेत. या व्हिडीओत संजय शिरसाट हे सिगारेट पिताना आणि फोनवर बोलतानाही दिसत आहेत. त्यासोबतच या व्हिडीओत त्यांचा पाळीव कुत्राही फिरताना दिसत आहे. सध्या संजय शिरसाट यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

**संजय राऊत काय म्हणाले?**

खासदार संजय राऊत यांनी या व्हिडीओवरुन शिंदे गटावर टीका केली आहे. आयकर विभागाची नोटीस आलेल्या मंत्र्याचा व्हिडीओ माझ्याकडे आहे, असा खळबळजनक दावा संजय राऊत यांनी केला होता. माझ्याकडे असलेल्या व्हिडीओत संबंधित मंत्री पैशांच्या बॅगा घेऊन बसलेत हे दिसत आहे, असेही संजय राऊतांनी म्हटले होते. या व्हिडीओमुळे आता राजकारणात खळबळ उडाली आहे. तसेच यामुळे शिरसाट यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान हा व्हिडीओ समोर येताच संजय शिरसाट यांच्याबाबत वेगवेगळे तर्क लढवले जात आहेत. पैशांनी भरलेली बॅग नेमकी कुठून आली? संजय शिरसाट यांच्याकडे पैसे कुठून आले? असा सवालही केला जात आहे. यावरच आता समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. ती बॅक पैशांनी भरलेली नाही. तिच्यात कपडे आहेत, असा दावा शिरसाट यांनी केला आहे.



**संजय शिरसाट यांना आयकर विभागाची नोटीस**

संजय शिरसाट यांना नुकतंच आयकर खात्याने नोटीस बजावली आहे. छत्रपती संभाजीनगरमधील विट्स हॉटेलच्या लिलावात झालेल्या गैरव्यवहाराच्या मुद्द्यावरुन शिरसाट यांना नोटीस देण्यात आल्याचे बोललं जात आहे. मात्र पहिल्यांदाच सत्ताधारी मंत्र्याला आयकर विभागाची नोटीस आल्याने चर्चा रंगली आहे. सध्या महायुतीत अतंर्गत वाद समोर येत आहेत. त्यातच आता संजय शिरसाट यांना आलेल्या आयकर विभागाने नोटीस पाठवल्यानंतर चर्चांना उधाण आले आहे. त्यातच आता संजय शिसराट यांचा नवीन व्हिडीओ समोर आल्यानंतर सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. त्यामुळे आता आयकर विभाग संजय शिरसाट यांच्या घरी जाऊन त्यांच्या मालमत्तेची झाडाझडती घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सोमवारी महाराष्ट्र बंद!

## सरकारच्या 'या' निर्णयाविरोधात मोठा एल्गार

**■मुंबई। प्रतिनिधी :**

राज्यातील जनतेसाठी महत्वाची बातमी आहे, सोमवारी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. सरकारच्या कर धोरणांविरुद्ध इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने १४ जुलै २०२५ बंद पुकारला आहे. त्यामुळे सोमवारी राज्यातील सर्व परमिट रूम आणि बार पूर्णपणे बंद राहणार आहेत, यामुळे राज्याच्या महसुलावर मोठा परिणाम होणार आहे. हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने म्हटले आहे की, सरकारने काही दिवसांपूर्वी दारूवरील व्हॅट दुप्पट केला आहे. त्यामुळे ज्यामुळे हॉटेल आणि बार उद्योगावरील आर्थिक भार वाढला आहे. त्याचबरोबर परवाना शुल्कात १५% आणि उत्पादन शुल्कात ६०% वाढ करण्यात आली असल्याने व्यापाऱ्यांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बंदची घोषणा करण्यात आली आहे.

**संपूर्ण राज्यावर परिणाम होणार**

१४ जुलै असणाऱ्या बंदचा परिणाम संपूर्ण राज्यावर होणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर या शहरांमध्ये बंदचा परिणाम जाणवणार आहे. सोमवारी सर्व परमिट रूम, बार आणि मद्यपान विक्री करणारे हॉटेल-रेस्टॉरंट बंद राहणार आहेत. हा बंद शांततेत असणार आहे, मात्र जर सरकारने दखल घेतली नाही तर आगामी काळात हिंसक आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

हा बंद राजकीय चळवळ नसून आणच्या उद्योगाच्या अस्तित्वासाठीचा लढा आहे. आम्ही सरकारकडून न्याय्य कर धोरणाची मागणी करत आहोत, आमच्या मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असेही संघटनेने म्हटले आहे.



**बार चालकांमध्ये नाराजी :** इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन आणि इतर संघटनांनी राज्य सरकारच्या निर्णयाचा निषेध केला आहे. संघटनांचे म्हणणे आहे की, ही करवाढ व्यवसायासाठी हानिकारक आहे, त्याचबरोबर लहान आणि मध्यम दर्जाच्या हॉटेल्स आणि बार चालवणे कठीण बनले आहे. यामुळे हजारो लोकांच्या नोकऱ्यांवर आणि लाखो कुटुंबांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनच्या अध्यक्षांनी एक निवेदन जारी करत म्हटले की, सरकारचे कर धोरण अन्यायकारक आहे. आम्ही याबाबत प्रशासनाला अनेक वेळा माहिती दिली आहे, मात्र आम्हाला समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आम्ही राज्यव्यापी बंदचा निर्णय घेतला आहे.




## पुढील ४८ तास धोक्याचे, महाराष्ट्रासह १६ राज्यांना हायअलर्ट

भारतीय हवामान विभागाकडून पुढील दोन ते तीन दिवस उत्तर - पश्चिम भारत आणि पुढचे चार ते पाच दिवस मध्य भारतामध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आयएमडीनं दिलेल्या माहितीनुसार उत्तर-पश्चिम भारत आणि मध्य भारातामध्ये पुढील ४८ ते ७२ तास जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडू अनेक राज्यांना हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे, नागरिकांना देखील सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार मध्य प्रदेश, हरियाणा, चंदीगढ, दिल्ली, हिमाचल प्रदेश, जम्मू, पंजाब आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर दुसरीकडे छत्तीसगढ, तटीय कर्नाटक, पूर्व उत्तर प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपूरा, ओडिशा राजस्थान, उत्तराखंड या राज्यांमध्ये देखील अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागानं दिलेल्या इशाऱ्यानुसार पुढील ४८ ते ७२ तासांमध्ये अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. मध्य प्रदेश, जम्मू काश्मीर, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश या राज्यांसाठी पावसाचा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रातही अनेक भागांमध्ये पावसाची शक्यता आहे.

## चिमुकले शाळेच्या शौचालयातील बेसिनमध्ये धूत आहेत जेवणाचे ताट

## पनवेल महापालिकेच्या शाळेतील धक्कादायक प्रकार

**■नवी मुंबई। प्रतिनिधी :**

मुलं देवाघरची फुलं असं आपण म्हणतो. मुलांचं पालणपोषण चांगलं झालं, शिक्षण चांगलं झालं तर तीच मुलं उद्या देशाचं भविष्य घडवू शकतात. ही मुलं देशाचं एक महत्त्वाचं संसाधन आहे. कारण उद्या हीच मुलं मोठं होऊन देशाचं नाव मोठं करणार आहेत. पण लहान मुलांच्याबाबत प्रशासन, शिक्षण विभाग खरंच संवदेशनशील आहे का? असा प्रश्न उपस्थित होतोय. असा प्रश्न उपस्थित होण्यामागचं कारणदेखील तसंच आहे. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पनवेल महापालिकेच्या शाळेत एक अतिशय धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

पनवेल महापालिकेच्या श्रीगणेश विद्यामंदिर शाळा क्रमांक ६, धाकटा खांदा येथे धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



या शाळेत लहान मुलांना शौचालयाजवळ असणाऱ्या बेसिनमध्ये अक्षरशः जेवणाची ताटे धुवावी लागत आहेत. संबंधित प्रकारचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर अनेकांकडून संताप व्यक्त केला जातोय.

**कठोर कारवाई करण्याची मागणी**

पालक आणि नागरिकांकडून या प्रकरणी कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. या प्रकरणात संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी अशी मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे मुलं जेवणाची ताट धुत आहेत, याचा अर्थ त्या शाळेत काम करण्यासाठी इतर कर्मचारी नाहीत का? तसेच संबंधित शाळेत ताट धुण्यासाठी स्वच्छ असं वेगळं बाथरुम किंवा बेसिंग का नाही? असा प्रश्न देखील या निमित्ताने उपस्थित केला जातोय.

**काय कारवाई होणार?**

या प्रकरणात शिक्षण विभागाच्या ढिसाळपणावर कुणी लक्ष देणार आहे की नाही? असा देखील प्रश्न उपस्थित होतोय. राज्य विधीमंडळाचं सध्या पावसाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात या शाळेचा मुद्दा उपस्थित होईल का? ते पाहणं देखील महत्त्वाचं आहे. तसेच शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे या व्हिडीओनंतर संबंधित शाळा प्रशासन, अधिकाऱ्यांवर काय कारवाई करतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

**घटनेनंतर स्कूल परिसरात तणावपूर्ण परिस्थिती**

परभणीमधील हायटेक रेसिडेनशियल स्कूलमधील या घटनेने शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ माजली आहे. परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात निवासी गुरुकुल शिक्षण पद्धती निर्माण झाल्या असून अनेक शाळा पालकांची फीसाठी पिळवणूक करत असल्याचा घटना नेहमीच घडत असतात. पण ही गुरुवारची घटना शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणारी आहे. या घटनेनंतर स्कूलच्या परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. पूर्णा पोलीस या घटनेचा सखोल तपास करत आहेत. त्याचबरोबर स्कूल परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## 'फी' परत मागितल्याने... अजित पवारांच्या नेत्याकडून झालेल्या बेदम मारहाणीत पालकाचा मृत्यू



**■परभणी। प्रतिनिधी :**

परभणीच्या झिरो फाटा परिसरात असणाऱ्या हायटेक रेसिडेनशियल स्कूलमध्ये एक धक्कादायक प्रकार घडला आहे. स्कूलमध्ये आपली मुलगी निवासी वसतिगृहात राहत नसल्याने तिचा टीसी आणि स्कूलमध्ये भरण्यात आलेली फी परत मागण्यासाठी आलेल्या पालकाला स्कूलच्या संस्थाचालक दाम्पत्याने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

या मारहाणीमध्ये पालकाचा मृत्यू झाला आहे. परभणी तालुक्यातील उखळद येथील ४२ वर्षीय जगन्नाथ हेंडगे यांची मुलगी पल्लवी ही झिरो फाटा येथील प्रभाकर चव्हाण यांच्या हायटेक रेसिडेनशियल स्कूलमध्ये निवासी होती. पण ती लहान असल्याने तिला आई वडिलांना सोडून या हायटेक रेसिडेनशियल स्कूलच्या निवासी वसतिगृहात करमत नव्हते. त्यामुळे पल्लवीला तिचे वडील जगन्नाथराव हे घरी घेऊन गेले होते.

**स्कूल संस्थाचालक आणि पत्नीवर गुन्हा दाखल**

गुरुवारी जगन्नाथ हेंडगे परत शाळेत येऊन आपल्या मुलीचा टीसी आणि स्कूलमध्ये भरलेली फी मागण्यासाठी शाळा व्यवस्थापणाकडे आले होते. त्यावेळी अजित पवार गटाचे नेते तथा शाळेचे संस्थाचालक प्रभाकर चव्हाण आणि त्यांच्या पत्नी हिंगोली जिल्हा परिषदेच्या माजी शिक्षण सभापती रत्नमाला चव्हाण या दोघांनी पालक जगन्नाथ हेंगडे यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीमध्ये पालक जगन्नाथ हेंगडे यांचा मृत्यू झाला. या मारहाण प्रकरणी पूर्णा पोलीस ठाण्यात मुंजाजी हेंगडे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कागदावरच्या ग्रामपंचायतीचा कोट्यवधींचा घोटाळा... शासकीय योजनेचं अनुदान लाटलं

**■लातूर। प्रतिनिधी :**

आपण अनेकदा एखाद्या शासकीय योजनेत घोटाळा झाल्याचं ऐकलंय. मात्र, अस्तित्वात नसलेल्या ग्रामपंचायतीच्या नावे कोट्यवधींचा घोटाळा झाल्याचं पहिल्यांदाच समोर आलंय. आणि हे सुद्धा महाराष्ट्रात. लातूरच्या उदगीर तालुक्यात अस्तित्वात नसलेल्या वंजारवाडी ग्रामपंचायतीच्या नावे शासकीय योजनेतील सवलतीतून अनुदान लाटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

महाराष्ट्रात अस्तित्वातच नसलेल्या ग्रामपंचायतीच्या नावे कोट्यवधींचा घोटाळा झाल्याचं उघडकीस आलंय. लातूरच्या उदगीर तालुक्यातील वंजारवाडी गावात ग्रामपंचायत असल्याचं कागदावर दाखवण्यात आलंय. ग्रामपंचायतीच्या नावे बनावट शिक्के, तसंच अधिकाऱ्यांच्या खोट्या सह्या आणि लेटरपॅड वापरून शासनाच्या बांधकाम कामगार कल्याण योजनेत घोटाळा करण्यात आला आहे. याच बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय योजनेतून शिष्यवृत्ती, साहित्य अनुदान आणि शैक्षणिक सवलती मिळवल्याचं समोर आलं आहे. एकाच गावात जवळपास ९० पेक्षा जास्त प्रमाणपत्र बनावट असल्याचं चौकशीतून स्पष्ट झालं आहे.

उदगीर तालुक्यातील वंजारवाडी हे गाव तोंडात या गटग्रामपंचायतीत समाविष्ट आहे. मात्र, वंजारवाडी ही ग्रामपंचायत असल्याचं कागदोपत्री दाखवून शासनाच्या बांधकाम कामगार कल्याण योजनेत कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करण्यात आलाय.




बनावट कागदपत्रांच्या आधारे ९० बोगस कामगारांची नोंद झालीये. या सर्वांच्या नावे शासनाच्या बांधकाम कामगार कल्याण योजनेतून शिष्यवृत्तीसह अनुदान लाटण्यात आल्यानं उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात एजंट, बांधकाम ठेकेदार आणि मल्टिसर्व्हिस चालकाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आलाय.

## जळगावच्या न्यायालयात साक्ष सुरू असतानाच आरोपीच्या डोक्यात पडला पंखा

**■जळगाव। प्रतिनिधी :**

जळगावच्या जामनेर न्यायालयात साक्ष सुरू असतानाच आरोपीच्या डोक्यात पंखा पडण्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत सुदैवाने आरोपी थोडक्यात बचावला आणि त्याला गंभीर दुखापत झालेली नाही. मात्र या घटनेवरून न्यायालयाच्या इमारतीतील असुविधा आणि डागडुजींचा अभाव इत्यादी प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जामनेर न्यायालयात एका खटल्यातील संशयित आरोपी असलेला दिनेश सुरजमल तेली हा कोर्टरूममध्ये पाठीमागे बसलेला होता. न्यायालयात साक्ष घेण्याचे कामकाज सुरू असताना अचानक छताचा फिरता पंखा निखळून आरोपीच्या डोक्यात पडला. या घटनेत सुदैवाने पंखा डोक्याच्या भागाकडून पाठीकडे निसटल्याने अनर्थ टळला असून आरोपीचे सुदैवाने प्राण वाचले. तसेच त्याला मोठी गंभीर दुखापत झाली नाही. या अचानक घडलेल्या घटनेनंतर कोर्टरूम मध्ये एकच गोंधळ उडाला होता.




अचानक घडलेल्या या प्रकाराने कोर्टरूम मध्ये एकच गोंधळ उडाला होता. या दरम्यान जीर्ण झालेली इमारत आणि सोयी सुविधांचा अभाव पाहता न्यायालयाची नवीन इमारत बांधली जावी अशी अपेक्षा वकिलांमधून व्यक्त होत आहे. डोक्यात पंखा पडलेल्या आरोपीची प्रकृती आता स्थिर आहे.

## मुलीवर धावत्या रेल्वेत लैंगिक अत्याचार, टॉयलेटमध्ये नेऊन सैतानानं लचके तोडले!

**■कल्याण। प्रतिनिधी :**

धावत्या मेल एक्सप्रेसमध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. कल्याणमध्ये एका मुलीला फूस लावून तिला मेल एक्स्प्रेसमध्ये बसवून आरोपीने तिच्यावर हा अत्याचार केला आहे. विशेष म्हणजे अत्याचार करून त्याने मुलीला आपल्या घरीही नेलं होतं. पण घरच्यांनी पीडित मुलीला तिला परत सोडून देण्यास सांगितल्यानंतर मुलीला अकोला रेल्वेस्थानकावरच सोडून आरोपीने पळ काढला. त्यानंतर हे सर्व प्रकरण समोर आले आहे. या घटनेनंतर आता सर्वत्र संताप व्यक्त केला जातोय.

**आधी जवळीक निर्माण केली, नंतर...**

कल्याण पूर्वेत राहणारी १६ वर्षीय तरुणीची २९ जून रोजी कल्याण स्टेशन परिसरात आली होती. कल्याण पश्चिमेकडून पूर्वेकडे पादचारी पुलावरून जात असताना तिला आकोला येथे राहणारा आरोपी गजानन चव्हाण भेटला होता. त्याने तिच्याशी ओळख वाढवत तिच्याशी गप्पा मारत जवळीक निर्माण तेली. नंतर तिला कल्याण स्थानकातून अकोल्याकडे जाणाऱ्या मेल एक्स्प्रेस गाडीत बसवलं. पुढे इगतपुरी ते अकोल्यादरम्यान तिला एक्सप्रेसच्या टॉयलेटमध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केले.



मिळालेल्या माहितीनुसार आरोपीने कल्याण रेल्वेस्थानकात एका अल्पवयीन मुलीसोबत मैत्री केली. त्यानंतर तिला अकोल्याला घेऊन जात असताना धावत्या मेल एक्सप्रेसच्या बाथरूममध्ये तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या आरोपीला कल्याण लोहमार्ग पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गजानन चव्हाण असे या आरोपीचे नाव आहे. आरोपीने अत्याचारानंतर पीडित अल्पवयीन मुलीला आकोला जिल्ह्यातील आपल्या घरी नेले होते. मात्र आई-वडिलांनी विरोध करत मुलीला घरी सोडण्यास सांगितल्याने आरोपीने तिला कल्याणला न सोडता अकोला रेल्वे स्थानकावरच सोडून पळ काढला. यानंतर अकोला पोलिसांनी या प्रकरणी अत्याचाराचा गुन्हा दाखल करत चौकशी चालू केली. तसेच कल्याण लोहमार्ग पोलिसांकडे तो गुन्हा वर्ग केला. या प्रकरणात कल्याण लोहमार्ग पोलिसांनी तपास करत आरोपीला अकोल्यातून बेड्या ठोकत कल्याणमध्ये आणलं. कल्याण रेल्वे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला 15 जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**मुलीला स्टेशनवरच सोडून काढला पळ**

एवढ्यावरच तो थांबला नाही. यानंतर तो तिला त्याच्या अकोला जिल्ह्यातील घरी घेऊन गेला. मात्र घरच्यांनी तिला स्वीकारण्यास नकार देत तिला घरी सोडण्यास सांगितल्याने. आरोपीने तिला कल्याणला न सोडता अकोला स्टेशनवरच सोडून पळ काढला. यानंतर अकोला पोलिसांनी याप्रकरणी अत्याचाराचा गुन्हा दाखल करत कल्याण लोहमार्ग पोलिसांकडे तो गुन्हा वर्ग केला होता. या प्रकरणात कल्याण लोहमार्ग पोलिसांनी तपास करत आरोपीला अकोल्यातून बेड्या ठोकत कल्याणमध्ये आणले. त्यानंतर आरोपीला कल्याण रेल्वे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला १५ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, हा प्रकार समोर आल्यानंतर सगळीकडे संताप व्यक्त केला जात आहे. अल्पवयीन मुलीची फसवणूक करून रेल्वेत अत्याचार केल्याने त्याला कठोरातील कठोर शिक्षा करावी, अशी मागणी केली जात आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# एकनाथ शिंदे गप्प का???

आपल्याकडे असलेल्या संख्याबळाच्या आधारावर उद्धव ठाकरे यांच्या हातून निवडणूक चिन्हासह शिवसेना आपल्या ताब्यात घेण्याचे अभूतपूर्व कार्य करणारे एकनाथ शिंदे सध्या राज्यात मराठी भाषेच्या मुद्द्यावर वातावरण पेटून उठलेले असताना एकदम गपगार आहेत. इतका आगडोंब सुरू असताना खरी शिवसेना आपल्याकडेच आहे, आपणच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे खरे वारसदार आहोत, उद्धव ठाकरे यांनी खरी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधली तिला आम्ही मुक्त केली, असा दावा करणारे एकनाथ शिंदे खर्‍या शिवसेनेची भूमिका पार पाडताना दिसत नाहीत, याचेच मराठीजनांना आज आश्चर्य वाटत आहे. त्यांच्यासारखेच बंड करून आपल्या काकांकडून राष्ट्रवादी काँग्रेस आपल्या ताब्यात घेणारे उपमुख्यमंत्री अजित पवार शिंदे यांच्या तुलनेत उजवे ठरले आहेत. कारण महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी लागू करण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नांच्या विरोधात जनता पेटून उठलेली असताना शिंदे शांत राहिले तर अजित पवार यांनी पहिली ते चौथी हिंदी शिकवण्याची गरज नाही, पाचवीपासून आहे ते ठीक आहे, अशी स्पष्ट भूमिका घेतली. राज्य सरकारमध्ये राहून सरकारच्या जीआरविरोधात भूमिका घेणे खरोखरच धाडसाचे आहे. कारण त्याचा फटका अजितदादांना बसू शकतो, पण त्यांनी त्याची पर्वा केली नाही. त्यांनी केंद्राच्या आदेशापेक्षा राज्यातील भाषातज्ज्ञांची आणि लोकांची काय भूमिका आहे, त्यांची काय भावना आहे, त्याचा विचार केला. पण दुसऱ्या बाजूला खरी शिवसेना ही आपल्याकडे आहे, असा दावा करणारे एकनाथ शिंदे मूक प्रेक्षकाच्या भूमिकेत असलेले दिसतात. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला मराठी भाषा आणि मराठी अस्मितेचा मुद्दा आला तेव्हा ठाकरे बंधू आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एका व्यासपीठावर आले. शिवसेनेची स्थापना ही मराठी माणसांच्या न्याय हक्कांसाठी झालेली होती. त्याला जागून जेव्हा मराठी माणसांच्या भाषेचा आणि अस्मितेचा मुद्दा आला, तेव्हा ठाकरे घराण्यातील राज आणि उद्धव ठाकरे पुढे आले. राज यांनी पहिलीपासून हिंदी लागू केल्यामुळे पुढील काही वर्षांनंतर मराठी पार पुसली जाईल. तिची जागा हिंदी घेईल, हा धोका दाखवून दिला. त्यामुळे मराठीला वाचविण्यासाठी सरकारला आवाज दिल्यानंतर अगोदर दोन तारखांना मोर्चे काढणारे ठाकरे एकाच दिवशी मोर्चा काढण्यासाठी तयार झाले. या दोन्ही ठाकरेंना राज्यातील मराठी लोकांचा पाठिंबा मिळाला, पण त्याचवेळी खरी शिवसेना आपल्याकडे आहे, असा दावा करणारे एकनाथ शिंदे मात्र काहीच बोलत नव्हते. फक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली त्यावेळी त्यांची री ओढण्याचे काम त्यांनी केले. मराठीबाबत शांत असलेले शिंदे पुण्यातील एका कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे शेरोशायरी गावून तोंड भरून गुणगाण करत असताना जय हिंद, जय महाराष्ट्र असे म्हटल्यावर पुढे जय गुजरात म्हणाले. त्यानंतर एकच हलकल्लोळ उडाला. त्यांच्याच पक्षाचे केंद्रातील राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची मुंबई ही गुजरातचीही राजधानी होती असे बोलून कहर केला. त्यांनी तसे का म्हटले, याची वेगळी कारणमीमांसा होऊ शकेल. पण एका बाजूला हिंदी भाषेच्या विरोधात मराठी अस्मितेसाठी सगळे मराठी भाषिक एक झालेले असताना आपली शिवसेना खरी असा दावा करणारे 'जय गुजरात' कसे काय म्हणतात, असा प्रश्न अनेकांना पडला. अमित शहा यांच्या उपस्थितीत जय गुजरात म्हणून त्यांनी शहा यांना खूश केले असले तरी त्यांनी मराठीजनांची नक्कीच नाराजी ओढवून घेतलेली आहे, हे काही वेगळे सांगण्याची गरज नाही. २०२४ ची राज्यातील विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर महायुतीला भरघोस यश मिळाले, पण एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळाले नाही, त्यामुळे त्यांनी विविध प्रकारे आपली नाराजी व्यक्त करून दाखवली होती. समजा उद्या देवेंद्र फडणवीसांना केंद्रातून बोलावणे आले तर मुख्यमंत्रीपदावर आपला दावा असावा, हा दूरदृष्टिकोन ठेवून शिंदे यांनी अमित शहा यांची भलामण करताना त्यांच्या मूळ राज्याचा गौरव केला असावा. पण असे करताना आपण मराठी माणसांची सहानुभूती गमावून बसत आहोत, याचा त्यांना विसर पडला. एकनाथ शिंदे यांनी अपेक्षित मानसन्मान आणि उच्च पद देण्यात येत नव्हते, त्यामुळेच त्यांनी शिवसेनेत बंड केले. भाजपसोबत आल्यानंतर त्यांना मुख्यमंत्रीपद देण्यात आले. त्यावेळी भाजपचे जास्त आमदार असूनही फडणवीस यांना बाजूला ठेवण्यात आले होते. मुख्यमंत्रीपदाची काय ताकद असते त्याचा त्यांनी अनुभव घेतलेला आहे. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदासाठी भाजपची साथ सोडली होती, आणि एकनाथ शिंदे यांनीही मुख्यमंत्रीपदासाठी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली होती, हे सगळ्यांनीच पाहिलेले आहे. पण आता जेव्हा मराठी भाषेचा आणि मराठी माणसांच्या अस्मितेचा मुद्दा आला, तेव्हा ठाकरे बंधू एकवटलेले दिसतात. राजकारणात कुणीची निःस्वार्थी नसतो, सगळे सत्तेची गणिते मांडत असतात. पण जेव्हा मराठी माणसाची भाषा आणि त्याच्या अस्मितेच्या आणि पर्यायाने अस्तित्वाचा प्रश्न येतो, त्यावेळी तुम्ही काय भूमिका घेता यावरून तुमचा खरेपणा सिद्ध होत असतो. आज मराठीच्या नावाने जनसागर उसळलेला असताना खरी शिवसेना आणि बाळासाहेबांचे विचार आपल्याकडे आहेत, असा दावा करणारे एकनाथ शिंदे गप्प का याचेच सखेद आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

# विरोधी पक्षनेतेपद हवेच का...

**विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहे. त्यासंदर्भात विरोधकांनी सरन्यायाधीशांना निवेदन दिले असले, तरी याबाबतीत न्यायव्यवस्थेचा हस्तक्षेप अपेक्षित नाही. आज विरोधी पक्षनेतेपदाचे महत्त्व कमी झाले असून, सत्ताधाऱ्यांनीही विरोधकांचा सन्मान करणे गरजेचे आहे.**



गतवर्षी विधानसभा निवडणुका पार पडल्या. नव्या विधानसभेत अजूनही विरोधी पक्षनेत्याचे आसन रिक्त आहे. मंगळवारी सरन्यायाधीश भूषण गवई विधान भवनात आले असताना त्यांना विरोधी पक्षांकडून एक निवेदन दिले गेले व या विषयात लक्ष घालावे, अशी विनंती झाली. ही बाब जराशी अचंबित करणारी आहे.

विरोधी पक्षनेतेपदावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने दावा केला आहे. महाविकास आघाडीतल्या (मविआ) काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांचे त्यांना समर्थन आहे. विधिमंडळाची निर्मिती व त्याचे कामकाज राज्यघटनेतील तरतुदीनुसार चालते आणि त्याचे रक्षण करणे ही सर्वोच्च न्यायालयाची जबाबदारी आहे, असे सांगत ते निवेदन सरन्यायाधीशांना देण्यात आले.

सरन्यायाधीश या विषयात लक्ष घालण्याची शक्यताही नाही आणि त्यांच्याकडून ते अपेक्षितही नाही. राज्यघटनेत संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका या तीन स्तंभाचे स्वतंत्र अधिकार मान्य करण्यात आले आहेत. न्यायपालिका संसदीय कार्यपद्धतीविषयी फार तर मत व्यक्त करेल. पण अधिकारकक्षेत हस्तक्षेप करणार नाही. याची जाणीव मविआला नसेल असे नाही. पण शिवसेनेचा आग्रह असल्यामुळे निवेदन दिले गेले असावे. खरे तर अशी वेळ यायला नको. तसेही संसदीय प्रथा परंपरांची जपणूक हा एका पक्षाचा विषय नसतो. सत्ताधारी पक्षाची जबाबदारी अधिक असते. विरोधी पक्षाला लोकांनी जाणीवपूर्वक मते दिलेली असतात, त्याचाही आदर करायचा असतो, ही भावना असेल तर बरेच प्रश्न सुटतील. हे भान पूर्वी जपले जात असे. लोकशाहीमध्ये समतोल राहिला पाहिजे, प्रत्येकाचे अधिकार मान्य केले पाहिजेत, या भावनेतून पूर्वी १२-१५ आमदार निवडून आलेल्या पक्षालाही विरोधी पक्षनेतेपद दिले गेले. जे नेते या पदावर बसले ते काही सत्ताधाऱ्यांच्या सोयीचे होते असे नव्हे. पण तेव्हा आजच्या एवढा विखार, दिसत नव्हता. पूर्वीही अनेक पक्ष फुटले, सरकार बदलले पण 'गिनगिनके हिशेब घेऊ' असा प्रकार नव्हता.

सभागृहात मुख्यमंत्री हे सभागृहाचे नेते म्हणून पहिल्या क्रमांकाच्या आसनावर बसतात. त्यांच्या समोर विरोधी पक्षनेत्याचे आसन आहे. संसदीय लोकशाही पद्धतीत विधिमंडळ सर्वोच्च आहे. तिथे सत्ताधारी, विरोधक यांचे अधिकार स्वतंत्र आहेत. त्याचा मान राखला जातो.

वरळीच्या जल्लोष मेळाव्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे म्हणाले की, सत्ता तुमची असेल पण ती विधान भवनात, रस्त्यावर सत्ता आमची आहे. या विधानाला टाळ्या मिळाल्या. पण सत्ता विधान भवनात नाही, तर मंत्रालयात असते. विधान भवन सर्वपक्षीय असते. विधिमंडळ सभागृहात समस्त जनता-जनार्दनाच्या भावना अधिकाराने मांडल्या जातात. सरकारने तिथे जबाबदारीने आपली बाजू मांडायची असते. असो. दोष ठाकरे यांचा नाही. मुळात राज काय आणि उद्धव काय, या दोघांनी विधिमंडळात आपले आमदार काय करतात, त्यांची उपस्थिती किती असते, ते कोणते प्रश्न मांडतात, कोणत्या चर्चेत भाग घेतात आणि कोणत्या घेत नाहीत, त्यांच्या दैनंदिन कामाचा आढावा काय, विधिमंडळाच्या समित्यांमध्ये आपले प्रतिनिधीत्व किती, तिथे आपल्या पक्षाची कामगिरी काय, कोणाची उठबस कोणाकडे असते, याचा नीट आढावा घेतला असता, तर कदाचित आज चित्र वेगळे असते.

सत्ता रस्त्यावरच असते, आणि पक्ष भाषण करूनच चालतो, यावरच त्यांचा ठाम विश्वास असावा. अन्यथा अतिशय महत्त्वाच्या अशा विधिमंडळ पक्ष, गटनेता, मुख्य प्रतोद या बाबींकडे त्यांनी बारकाईने लक्ष दिले असते. विरोधी पक्षनेतेपदानंतर दुसरे मानाचे पद विरोधी पक्षाकडे येते ते लोकलेखा समितीचे अध्यक्षपद. हे सुद्धा ठाकरेंच्या शिवसेनेला न मिळता काँग्रेसच्या विजय वडेट्टीवारांकडे गेले. या पदाचे महत्त्व मोठे आहे. या निर्णयावर शिवसेनेकडून कसलीही प्रतिक्रिया आली नाही. त्यांचा एकही विधानसभा सदस्य या समितीत नाही.

शिवसेनेत अशा मुद्द्यांकडे लक्ष दिले जात नाही, असेही म्हणता येत नाही. १९९०ला सेनेने मनोहर जोशी यांच्याकडे हे पद दिले. पण पक्ष फुटल्याने गोपीनाथ मुंडे विरोधी पक्षनेते झाले. त्यानंतर सातत्याने संख्याबळाच्या आधारावर सेनेने हे पद मिळविले. पुढे १९९९ ते २००९ या काळात सेनेकडून नारायण राणे, रामदास कदम हे विरोधी पक्षनेते झाले. हे पद २००९मध्ये भाजपकडे पुन्हा आले आणि एकनाथ खडसे या पदावर आले. १९९५ ते १९९९ या दरम्यान विरोधी पक्षनेते राहिलेले मधुकर पिचड, त्यानंतर नारायण राणे, रामदास कदम, एकनाथ खडसे, एकनाथ शिंदे, राधाकृष्ण विखे-पाटील या सर्वांनी आपापले मूळ पक्ष बदलले. आता ज्या भास्कर जाधवांना हे पद मिळालेले नाही, त्यांचीही भाषा भ्रमनिरासाची दिसते.

खरे पाहता विरोधी पक्षनेत्याचे महत्त्व किती राहिलेय हा चचेर्चा विषय आहे. पूर्वी या पदाकडे 'प्रतिमुख्यमंत्री' या भावनेने पाहिले जाई. या पदाला कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा असतो. त्यांना सरकारी वाहन, विधान भवनात कार्यालय, १५-१६ लोकांचा स्टाफ मिळतो. दौऱ्यावर असताना त्यांचा मान असतो. ते कुठे भेट देणार असतील तर अधिकारी तिथे हजर राहत. त्यांना एखादी माहिती हवी असेल तर ते अधिकाऱ्यांना पाचारण करू शकत असत. १९९० नंतर हळूहळू या पदाला मर्यादा येऊ लागल्या. विधिमंडळ कामकाजात या पदाचा मान ठेवला जातो. या पदावरील व्यक्ती काय बोलते याकडे जनतेचे लक्ष असल्याने त्यांना प्रसिद्धी मिळते.

गेल्या काही दशकांत गोपीनाथ मुंडे यांनी या पदाचा प्रभावी वापर केला. नारायण राणे यांनीही चांगलीच जरब निर्माण केली होती. एकनाथ खडसे व पृथ्वीराज चव्हाण यांच्यात बऱ्यापैकी सामंजस्य आहे असे चित्र होते. ती बाब राष्ट्रवादीने फार गांभीयार्ने घेतली. राणे यांच्या काळातच या पदाला सत्ताधारी बाकांची भूरळ पडली. अपवाद २०१९ नंतर जे जे विरोधी पक्षनेते झाले त्यांचाच. आताही समजा भास्कर जाधव यांना हे पद दिले गेले तर ते भाव खाऊन जातील, अशी भावना असेल आणि ठाकरेंच्या शिवसेनेला सुईच्या टोकावर बसेल, एवढेही काही द्यायचे नाही म्हणजे नाहीच, असे ठरले असेल, तर प्रश्नच संपला.

तसेही आज विरोधी पक्षाचे अस्तित्व चिंताजनक आहे. त्यांचे प्राधान्यक्रम लक्षात येत नाहीत. झारखंडमधील खासदार निशिकांत दुबे भलेही ठाकरेंना लक्ष्य करत असतील, पण त्यांनी समस्त मराठीजनांना बोल लावले. हेच पूर्वी घडले असते, तर विधिमंडळाने कदाचित निषेधाचा ठराव केला असता, सभागृहाचा रागरंग वेगळा दिसला असता.

पद मिळो वा ना मिळो, लोकांना विरोधी पक्ष जागरूक आहे, हे दिसले पाहिजे. लोकांनी आम्हाला मते दिली नाहीत, असे म्हणून रुसून कसे चालेल? सत्ताधारी बाजूनेही विरोधी पक्षाचा सन्मान करणे अपेक्षित असते. संसदीय लोकशाही राजकीय पक्षांच्या नव्हे, तर जनतेच्या मालकीची असते याचे भान असलेले बरे. अन्यथा वर्तमानकाळ उत्तम भासतो, भविष्य काय असेल कोणीही सांगू शकत नाही.

# भारतविरोधी तिघाडी




'ऑपरेशन सिंदूर'च्या दरम्यान पाकिस्तान, चीन आणि तुर्की या तिघांच्या आघाडीच्या विरोधात भारताला लढावे लागल्याचा लष्कराचे उपप्रमुख लेफ्टनंट जनरल राहुल आर. सिंह यांनी केलेला उल्लेख धक्कादायक नसला, तरी चिंताजनक आहे. पाकिस्तान आणि चीन या दोघांविरोधात भारताने युद्धे लढली आहेत आणि अलीकडच्या काळात लष्करी संघर्षही केला आहे. गेल्या काही वर्षांत या दोघांमधील आर्थिक आणि सामरिक जवळीक वाढली आहे. देशाच्या ईशान्येपासून पश्चिमेपर्यंतची प्रदीर्घ लांबीची सीमारेषा या दोन देशांशी जोडली असल्याने आणि त्यांची मैत्री दृढ होत असल्याने भारताला संरक्षणसज्ज राहण्याशिवाय पर्याय नाही. या दोघांपैकी कोणा एकाशी लष्करी संघर्ष सुरू असताना दुसऱ्याने आतापर्यंत भारताच्या विरोधात नवी आघाडी उघडली नाही हे खरे; परंतु चीनकडून पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर संरक्षण सामुग्री पुरविली जाऊ लागल्याने भारताच्या विरोधातील संघर्षात ते एकत्र आल्यासारखा परिणाम होऊ शकतो. 'ऑपरेशन सिंदूर'च्या दरम्यान याची प्रचिती आली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' ही काही भारताची युद्धखोरी नव्हती. ते पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारताने दिलेले उत्तर होते. भारताच्या विरोधात वापरण्यासाठी पाकिस्तान पोसत असलेले दहशतवादी आणि त्यांचे तळ भारताने लक्ष्य केले होते. त्यानंतर युद्धखोरी करीत पाकिस्तानने भारतीय लष्करी तळांवर हल्ले करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी भारताच्या लष्करी हालचालींची माहिती चीन पाकिस्तानला पुरवत होता; इतकेच नव्हे तर पाकिस्तानकडून शस्त्रसंधीसाठी संपर्क साधला गेला तेव्हाही भारताबद्दलची कळीची माहिती चीन देत होता.

# मुंबई धोक्याच्या पातळीवर

**वाढती लोकसंख्या, वाहतूककोंडी यावर उपाय म्हणून विविध वाहतूक प्रकल्प उभारले जात आहेत. मात्र त्यामुळे पर्यावरणाचे तर नुकसान होतच आहे, पण समुद्रकिनारी वसलेल्या शहरांना होणारा धोका वाढत आहे. किनारपट्टीवरील शहरांची नैसर्गिक सुरक्षा हिरावून घेत आहेत.**

मुंबई शहर सात बेटांनी मिळून बनले आहे. सात बेटांदरम्यान असलेल्या खाड्यांमध्ये भराव टाकून त्यावर मुंबई शहर वसले आहे. जुन्या इमारती, चाळी, झोपडपट्टी आणि टोलेजंग इमारतींमध्ये लाखो लोक दाटीवाटीने वास्तव्य करत आहेत. कमी जागेत लाखो लोक राहत आहेत. आजही मुंबईची लोकसंख्या अमाप वाढत असल्याने उपलब्ध पायाभूत सेवा-सुविधांवर प्रचंड ताण आला आहे. खासगी वाहनांची संख्या नियंत्रणात नसल्याने मुंबई वाहतूककोंडीत अडकली आहे. यावर उपाय म्हणून उड्डाणपूल, कोस्टल रोड, समुद्र मार्ग, मेट्रो मार्ग प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

शहरामध्ये प्रकल्प राबविण्यासाठी आता जागा उपलब्ध नसल्याने प्रमुख मार्ग आणि समुद्रकिनाऱ्यालगत किंवा समुद्रात पूल उभारण्यात येत आहेत. वांद्रे-वरळी सीलिंक, शिवडी न्हावा शेवा, कोस्टल रोड असे अनेक प्रकल्प समुद्रात उभारण्यात आले आहेत. या प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूककोंडी काही प्रमाणात दूर होऊन प्रवास वेगवान झाला आहे. मात्र या प्रकल्पांसाठी कित्येक कांदळवनांची कत्तल झाली आहे. यासह सागरी जीवांवर देखील परिणाम होत आहे. याकडेही गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे.

कोस्टल रोड थेट विरार, वाढवण बंदराशी जोडण्याची योजना सरकार आखत आहे. यामुळे मुंबईतून विरारपर्यंत पोहोचणे सहज शक्य होईल. परंतु यामुळेही मासेमारीचे, पर्यावरणाचे नुकसान होणारच आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रगती साधत असताना याचा निसर्गावरही विपरीत परिणाम होत आहे. याचा प्रत्यय नुकताच आला. हाय टाइडमुळे कोस्टल रोडवर पाणी, दगड आले. यामुळे जीवितहानी झाली नसली तरी ही घटना पुढील परिस्थितीची जाणीव करून देणारी निश्चितच आहे.

सागरी पुलांमुळे मुंबईला धोका असल्याचा इशारा यापूर्वी जागतिक जोखीम व्यवस्थापन संस्था असलेल्या आरएमएसआय या संस्थेने दिला आहे. समुद्र पातळीत वाढ होत असल्याचा सर्वाधिक धोका मुंबई किनारपट्टीला बसणार आहे. २०५० पर्यंत समुद्र पातळीच्या संभाव्य वाढीमुळे सुमारे ९९८ इमारती आणि २४ किलोमीटर लांबीचा रस्ता प्रभावित होणार आहे, तर भरतीच्या वेळी समुद्र पातळी वाढल्याने अंदाजे २ हजार ४९० इमारती आणि १२६ किलोमीटर लांबीचा रस्ता प्रभावित होण्याचा इशारा आरएमएसआय या संस्थेने दिला आहे. यामुळे हाजी अली दर्गा, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, वांद्रे-वरळी सीलिंक आणि मरीन ड्राईव्हवरील क्विन्स नेकलेस पाण्याखाली जाणार असल्याचा दावा संस्थेने केला आहे.

२०२२ मध्ये या संस्थेने समुद्राच्या पातळीत वाढ झाली




असता भारतातील मुंबई, कोची, मंगलोर, चेन्नई, विशाखापट्टणम आणि तिरुवनंतपुरम या किनारपट्टीवरील शहरांवर होणाऱ्या परिणामांबाबत अहवाल सादर केला होता. या अहवालामध्ये किनारपट्टी भागातील शहरांना धोका असल्याचा इशारा देण्यात आला आहे. संस्थेच्या तज्ज्ञांनी अभ्यासाकरिता शहरांच्या किनारपट्टींचे उच्च-रिझोल्यूशन डिजिटल टेरेन मॉडेल (टोपोग्राफी) तयार केले. त्यानंतर त्यांनी समुद्र पातळीच्या वाढीच्या विविध अंदाजांवर आधारित शहरांच्या पूर पातळीचा नकाशा तयार करण्यासाठी किनारपट्टीवरील पूर मॉडेलचा वापर केला. तसेच आयपीसीसी संस्थेचा अहवाल आणि केंद्राच्या विज्ञान मंत्रालयाच्या अहवालाचाही आधार घेतला आहे.

त्यानुसार कोचीमध्ये २०५० पर्यंत सुमारे ४६४ इमारतींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. भरतीच्या काळात ही संख्या सुमारे १ हजार ५०२ इमारतींवर पोहोचेल. तिरुवनंतपुरममध्ये २०५० पर्यंत समुद्राची पातळी वाढल्यामुळे आणि भरती-ओहोटीने समुद्राची पातळी उंचावल्यामुळे अनुक्रमे ३४९ आणि ३८७ इमारतींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. विशाखापट्टणममध्ये २०५० पर्यंत किनारपट्टीवरील संभाव्य बदलांमुळे सुमारे २०६ इमारती आणि नऊ किमी रस्त्यांचे जाळे जलमय होण्याची शक्यता आहे. तसेच समुद्राची पातळी किमान २०५० पर्यंत वाढेल आणि नंतर स्थिर होईल, असा निष्कर्षही संस्थेने काढला आहे.

अरबी समुद्राच्या विस्तीर्ण किनारपट्टीमुळे महाराष्ट्र पूर्वी चक्रीवादळांच्या दृष्टीने सुरक्षित मानला जात होता. मात्र, हवामान बदलाच्या परिणामामुळे मुंबईला असणारा चक्रीवादळांचा धोका वाढू लागला आहे. मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर इथे मुसळधार पाऊस, जोरदार वारे, समुद्री लाटा आणि पूर यांचा प्रभाव जाणवत असल्यामुळे हे किनारी जिल्हे जोखमीच्या क्षेत्रात येतात. त्यामुळे सागरी मार्गांना धोका निर्माण झाला आहे.

मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर, नवी मुंबई महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्यात येत आहेत. हे प्रकल्प खाडीकिनारी राबविण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात कांदळवनं तोडण्यात येत आहेत. पूर नियंत्रणात आणणारी कांदळवनं नष्ट होत असल्याने मुंबई, ठाणे जिल्ह्यांना पुराचा मोठा फटका बसू शकतो. यासोबतच मुंबईमध्ये जागेची कमतरता असल्याने काही प्रकल्पांसाठी मिठागरांची जमीन देण्यात येत आहे. या जमिनींवर टोलेजंग इमारती झाल्यास मुसळधार पावसात मुंबईला पुराच्या संकटाला सामोरे जावे लागू शकते. यासोबतच मुंबईतील नदीकाठांवर झालेली अतिक्रमणे ही मुंबईमधील पुरास कारणीभूत ठरू शकतात. मुंबईत दिवसेंदिवस झाडे कमी होत आहेत. यामुळेही मुंबईतील पर्यावरणाचा प्रश्न अति बिकट होत समोर येणार आहे.

# गोरगरीब रुग्णांची लयलूट

**महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा उद्देश गोरगरीबांना मोफत उपचार देणे असला तरी खासगी व धर्मादाय रुग्णालये, तसेच शासकीय रुग्णालयांतही गोरगरीबांची लूट सुरू आहे. औषधे, शुल्क व सेवांमध्ये गैरप्रकार होत असून शासनाने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.**

राज्य सरकारने राज्यातील गोरगरीब रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना २०१२ मध्ये सुरू केली; मात्र आता या योजनेतील गोरगरीब रुग्णांची लूट होऊ लागल्याचे समोर येऊ लागले आहे. गोरगरीबांना लुटणाऱ्या माणुसकी नसलेल्या लुटारूंना वेळीच त्यांची योग्य जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. अन्यथा गोरगरीबांना उपचाराविना तडफडून मरण्याची वेळ येऊ शकते.

खासगी रुग्णालये मनमानी पद्धतीने वैद्यकीय उपचाराचे शुल्क वसूल करत असल्याची अनेक उदाहरणे समोर आली आहेत. यानंतरही अशा रुग्णालयांवर कोणाचाही अंकुश नाही. एखादी घटना घडल्यास त्याचा बाऊ होतो; मात्र कालांतराने शासकीय यंत्रणेसह लोकही घटना विसरून जातात. धर्मादाय रुग्णालयेही याला अपवाद नाहीत. ज्यांच्याकडे बक्कळ पैसा आहे. ते उपचारासाठी खासगी रुग्णालयात जातात. परंतु गोरगरीबांना शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रुग्णालयांशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे शासकीय, महापालिकेच्या रुग्णालयात मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. परंतु या रुग्णालयातही रुग्ण आणि नातेवाईकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

गोरगरीब रुग्णांवर मोफत उपचार व्हावेत, यासाठी सरकारने महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना जाहीर केली. या योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये रोख रक्कमरहित द्वितीय व तृतीय दर्जाचे उपचार करण्यात येतात. राज्य सरकारची महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना आणि केंद्र सरकारची आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांचा उद्देश एकच असल्याने १ एप्रिल २०२०पासून या दोन्ही योजनांचा एकत्रित लाभ गोरगरीब रुग्णांना उपक्रम करून देण्यात आला आहे. या योजनेनुसार राज्यातील गोरगरीब रुग्णांना कोणत्याही शासकीय व खासगी अंगीकृत रुग्णालयात जाऊन उपचार घेता येतात. तसेच राज्य सरकारने सर्व कुटुंबांसाठी महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढवत लाभार्थ्यांनुसार योजनेमध्ये गटवारी केली आहे. त्याप्रमाणे १ जुलै २०२४ पासून विस्तारीत व्याप्तीसह एकात्मिक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत समाविष्ट असलेल्या सर्व आजारावरील उपचार रुग्णालयात मोफत होतात. त्याचप्रमाणे ३४ विशेष सेवांतर्गत शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय सेवा उपलब्ध केल्या जातात. तसेच या योजनेंतर्गत कुटुंबातील एक किंवा सर्व सदस्यांसाठी प्रतिवर्ष पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य संरक्षण देण्यात येते.

राज्यात सुमारे ६,५०० रुग्णालये आहेत. त्यापैकी केवळ दोन हजार १९ रुग्णालये या योजनांमध्ये सहभागी झाली आहेत. ही रुग्णालये महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना आणि केंद्र सरकारची आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी करण्यास नकार देत आहेत. २०१९ ते मे २०२५ या काळात महाराष्ट्रातील राज्य आरोग्य विमा सोसायटीकडे उपचार नाकारल्याच्या ८७१ रितसर तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. ३४७ तक्रारी धर्मादाय रुग्णालयांविरोधात तर ५२४ तक्रारी खासगी रुग्णालयांविरोधातील आहेत. उपचार नाकारल्यानंतर सरकारकडून रुग्णालयावर फक्त




एम्पॅनलमेंटची कारवाई करण्यात येते. त्यामुळे रुग्णालयाला योजनेतून सूट मिळते. यामुळे गोरगरीब रुग्णांना चांगल्या रुग्णालयातील उपचार घेता येत नाहीत. सरकारने अशा रुग्णालयांवर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे किंवा कठोर कायदा करून या योजनांमध्ये सर्व रुग्णालयांना सहभागी होणे बंधनकारक करायला हवे. त्याचप्रमाणे उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांचा परवाना त्वरित निलंबित करण्याचा निर्णय घ्यावा, तरच ही रुग्णालये गोरगरीबांना सेवा देण्यापासून पळ काढणार नाहीत.

एका बाजूला खासगी धर्मादाय रुग्णालये या योजना नाकारत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या किंवा शासकीय रुग्णालयातही या योजनांमध्ये गोरगरीब रुग्णांची लूट सुरू आहे. मुंबई महानगरपालिकेंतर्गत असलेली सायन आणि केईएम ही रुग्णालये ६० हजार ते एक लाख २० हजार असे चॅरिटेबल ट्रस्टच्या नावाने रुग्णांकडून पैसे घेत आल्याची माहिती आमदार चित्राताई वाघ यांनी विधान परिषदेत नुकतीच दिली. महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार घेत असलेल्या एका रुग्णाकडून सायन हॉस्पिटलमध्ये बिल्डिंग फंड म्हणून ६५ हजार रुपये घेण्यात आले, तर याच योजनेचा लाभ घेणाऱ्या रुग्णांकडून केईएम रुग्णालयात पुअर बॉक्स फंडच्या नावाखाली पैसे घेण्यात आले. पैसे नसल्याने गोरगरीब या योजनेचा लाभ घेण्यासाठी येतात. मात्र याच रुग्णांची लूट सुरू असल्याचे वास्तव समोर आले आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मेडिकलची यादी तयार करण्यात आली आहे. या यादीतील एका मेडिकलमधून औषधे घेण्यास सांगण्यात येते. मंजूर झालेल्या पैशांमधून मेडिकलवाले औषधे देतात. अधिकचे पैसे झाल्यास रुग्णांच्या नातेवाईकांकडून ते वसूल करण्यात येतात. उपचारासाठी लागणारी औषधे डॉक्टर रुग्णांच्या नातेवाईकांना आणण्यास सांगतात. यामध्ये अनेकदा गरजेपेक्षा अधिक औषधे मागविण्यात येत असल्याचे रुग्णालयातील कर्मचारी खासगीत सांगतात. अतिरिक्त औषधांचा खच शस्त्रक्रिया विभागात पडलेला असतो. तो कचऱ्यात फेकावा लागत असल्याचे कर्मचारी सांगतात. त्यामुळे गोरगरीबांच्या पैशांची कशी लूट सुरू आहे, हे स्पष्ट होते.

ही योजना लागू होण्यापूर्वी सायन हॉस्पिटलबाहेरील मेडिकल रुग्णांच्या नातेवाईकांचा हात धरून मेडिकलमध्ये घेऊन जात असत. येथील सर्वच मेडिकल डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांवर २० टक्क्यांपर्यंत सवलत देत होती; मात्र आज हीच मेडिकल महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. आता या योजनेतील रुग्णांच्या औषधांवर कोणतीही सूट देत नाहीतच. मात्र आज थेट ग्राहक या योजनेच्या माध्यमातून मेडिकलशी जोडला गेल्याने मेडिकल व्यावसायिकांची दिवाळी सुरू आहे.

# पुण्यात प्राण्यांच्या तस्करी बळावली, दीड वर्षात २४ गुन्हे दाखल, नागरिक कायद्यानिशी अनभिज्ञ

**पुणे** : हौस म्हणून पाळण्यासाठी, मांस खाण्यासाठी; तसेच अंधश्रद्धेच्या कारणास्तव वन्यप्राण्यांची खरेदी-विक्री किंवा तस्करी करणाऱ्या टोळ्या पुण्यातही आता सक्रिय झाल्या आहेत. वन विभागाने गेल्या दीड वर्षात सातत्याने केलेल्या कारवायांमध्ये वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत २४ गुन्हे दाखल झाले आहेत. लहान-मोठ्या कारवायांमध्ये ताब्यात घेतलेल्या ३५ वन्यप्राण्यांना सध्या 'रेस्क्यू' संस्थेच्या वन्यजीव उपचार केंद्रात ठेवले आहे.

वन विभागाची गुन्हे शाखा पथक सध्या आक्रमक झाली असून, धडक मोहिमांद्वारे वन्यप्राण्यांचा बेकायदा व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करते आहे. भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार, कोणत्याही वन्यप्राण्याची शिकारः तसेच त्यांच्या अवयवांच्या खरेदी-विक्रीस पूर्ण बंदी आहे. मात्र, काळ्या बाजारात वाढत असलेल्या मागणीमुळे चोरट्या शिकारी आणि तस्करीचे प्रयत्न सुरू आहेत. पुणे जिल्ह्यात होत असलेल्या शिकारींमध्ये प्रामुख्याने बिबट्या, रानडुक्कर, भेकर, सांबर, खवल्या मांजर, ससे या प्राण्यांचा समावेश आहे आणि तस्करी,



खरेदी-विक्राच्या घटनांमध्ये परदेशी प्राण्यांसह रानमांजर, खवल्या मांजर, मुंगूस, सरिसृप प्राणी, पोपटासह विविध प्रकारचे पक्षी, कासवांना मागणी आहे.

पाच ते सात वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रात मांस, वन्यप्राण्यांचे विविध अवयव यांपासून औषधे तयार करण्यासाठी आणि जादूटोणा, अंधश्रद्धेच्या कारणास्तव वन्यप्राण्यांची शिकार किंवा त्यांची खरेदी-विक्री होत असे. मात्र, आता शहरी नागरिकांमध्ये परदेशाप्रमाणेच वन्यप्राणी पाळण्याची क्रेझ वाढते आहे. पेट शॉप, ट्रेडर्सकडून विदेशी आणि स्थानिक प्राण्यांची विक्री होते. सर्वसामान्य नागरिक मात्र वन्यजीव संरक्षण कायद्याबद्दल अनभिज्ञ आहेत. त्यामुळे अनेकांच्या घरात पिंजऱ्यात पोपट, कासव, माकडही पाळलेले दिसतात. गेल्या दीड वर्षांत अशा अनेक घटना उघडकीस आल्या असून, वन विभागाने नागरिकांना समज देऊन पक्षी, प्राणी निसर्गात सोडून देण्यास सांगितले आहेत.

**'हौसेची वन्यप्राणीखरेदी अनभिज्ञतेने'**

ग्रामीण भागात मांसासाठी रानडुक्कर आणि सांचराची शिकार केली जाते. शहरातूनही अनेकदा या मांसाची मागणी असते. वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार हा गुन्हा असल्याने बोरट्या शिकारी रोखण्यासाठी

> "पुणे शहर आणि जिल्ह्यात झालेल्या वेगवेगळ्या कारवायांमध्ये बेकायदा पाळलेल्या ३५ वन्यप्राण्यांना वनाधिकाऱ्यांनी ताब्यात घेऊन बावधन येथील वन्यजीव उपचार केंद्राच्या स्वाधीन केले. यात पक्ष्यांची संख्या जास्त असून, प्रामुख्याने वेगवेगळ्या प्रकारचे पोपट, घारी, मैना यांचा समावेश आहे. या पक्ष्यांना पिंजऱ्यात बंदिस्त ठेवल्याने त्यांची अवस्था बिकट होती. वन्य प्राण्यांमध्ये भारतीय आणि परदेशी जातीच्या माकडांचा समावेश होता. इंडियन स्टार टॉरटाइज, इंडियन रूफ टर्टल, इंडियन टेंट टर्टल, रेड सँड ओबा (सापाचा प्रकार) या प्राण्यांना बेकायदा खरेदी-विक्री प्रकरणात ताब्यात घेतले होते. या प्राण्यांवर केंद्रात उपचार करण्यात आले."
>
> **-नचिकेत उत्पात, 'रेस्क्यू' संस्थेचे माहिती विभाग प्रमुख**

आम्ही गेल्या वर्षभरात आम्ही मोठ्या कारवाया केल्या. यात २४ लोकांवर गुन्हे दाखल केले, काळ्या जादूसाठी, शुभचिन्ह म्हणून, आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणीचे प्रलोभन दाखवून वन्यप्राण्यांची तस्करी, शिकारीसाठी लोकांना प्रवृत्त केले जात आहे. कायद्यानुसर वन्यजीव पाळणे हादेखील गुन्हा आहे; पण अनेक लोक याबद्दल अनभिज्ञ असल्याने पोपट, दुर्मीळ कासवे, माकडासह लहान मोठे प्राणी हौसेने खरेदी करतात. त्यामुळे आम्ही समाजमाध्यमांतून याबाबत सातत्याने जनजागृती सुरू केली आहे, अशी माहिती सहायक वनसंरक्षक मंगेश ताटे यांनी दिली.

**परदेशी प्राण्यांची समस्याच वेगळी**

नागरिक उत्साहाने परदेशी पक्षी, कासव, साप, अजगर विकत घेतात. यातील अनेकांना प्राण्यांची देखभाल करणे जमत नाही, पुरेसा वेळ देता येत नाही. काही घटनांमध्ये प्राणी मरतात किंवा नागरिक सार्वजनिक ठिकाणी त्यांना सोडून देतात. परिणामी, या आक्रमक परदेशी प्राण्यांमुळे स्थानिक वन्यजीवांचे नुकसान होते.

## पोलिसांना निर्देश

८ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ जण अटकेत आहेत. त्यांना १५ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. उर्वरित ३ जणांची पोलीस चौकशी करण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले. दोन विश्वस्त यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र इतर दोन विश्वस्त यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याची मागणी करत पालकांनी याआधी घडलेल्या काही घटना उजेडात आणल्या. याबाबत पोलीस, पालक, शिक्षण विभाग यांची बैठक घेऊन पालकांच्या तक्रारी जाणून घेत सखोल तपास करावा, अशा सूचना चाकणकर यांनी पोलिसांना दिल्या आहेत.

## शहापूर शाळा प्रकरण : मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये - रूपाली चाकणकर

**शहापूर** : ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या शाळेत घडलेल्या आक्षेपार्ह प्रकारानंतर शाळेची मान्यता रद्द करण्याची कारवाई शिक्षण विभाग करेल, मात्र यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही सुरू करावी. तसेच पोलिसांनी पालकांना विश्वासात घेऊन सखोल तपास करावा असे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिले आहेत.

शहापूरच्या शाळेत स्वच्छतागृहात मासिक पाळीचे रक्त आढळल्याने मुख्याध्यापिकांनी महिला सफाईगारामार्फत सर्व मुलींची आक्षेपार्ह शारीरिक तपासणी केली. राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली असून राज्य



महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी गुरुवारी शहापूर मध्ये पालकांची भेट घेतली. पालकांचे म्हणणे तसेच शिक्षण विभाग, पोलीस तपासाचा आढावा घेतल्यानंतर चाकणकर म्हणाल्या, शिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी केल्यानंतर शाळेत तक्रार निवारण समिती नसणे, सखी सावित्री समिती केवळ रजिस्टर नोंद असणे अशा अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत.

या गंभीर घटनेतील आरोपी मुख्याध्यापिका यांना निलंबित करण्यात आले आहे. तपासणीनंतर शिक्षणाधिकारी यांनी शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाला पाठविण्यात आला आहे. मात्र मान्यता रद्द झाल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. तेव्हा सोमवारपासून स्वतंत्रपणे पुन्हा शाळा सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचना शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

अपमानजनक शारीरिक तपासणीला सामोरे गेलेल्या मुलींच्या मानसिकतेचा विचार करून सर्व मुलींचे बाल कल्याण समितीकडून समुपदेशन करण्यात यावे, असेही चाकणकर यांनी प्रशासनास सांगितले.

## बंदी आदेश झुगारून अवजड वाहनांची वाहतूक सुरूच

**डहाणू** : तालुक्यातील कासा ते संजाण दरम्यानच्या राज्य मार्ग क्रमांक ७३ वरील रस्ते रुंदीकरण व सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम सध्या सुरू असून, या मार्गावरून अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करण्याचा आदेश प्रशासनाने दिला आहे. मात्र, हा आदेश केवळ कागदावरच असल्याचे चित्र असून, प्रत्यक्षात अवजड वाहने सर्रासपणे या मार्गावरून धडधडत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांत तीव्र संताप निर्माण झाला आहे. पालघरचे अप्पर जिल्हादंडाधिकारी सुभाष भागडे यांनी ३ जुलै रोजी राज्य मार्ग क्रमांक ७३ वरील कि.मी. ४५/८०० ते ९९/४०० दरम्यान रस्ते रुंदीकरण, काँक्रीटीकरण व पूल दुरुस्तीच्या कामासाठी अवजड वाहनांवर ४ जुलै ते २ ऑगस्ट २०२५ या कालावधीत बंदी आदेश काढला आहे. विशेषतः कि.मी. ५५/७०० वरील पूल अतिशय



खराब अवस्थेत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने नमूद केले आहे. या बंदी आदेशाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी म्हणून अवजड वाहनांसाठी पर्यायी मार्गही जाहीर करण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात ही वाहतूक रात्रीच्या वेळी कासा - सायवन - उधवा - तलासरी मार्गावरून सर्रास सुरू आहे. यामुळे रस्त्यावर चिखल साचल्याने वाहनांचे अपघात, वाहतुकीची कोंडी आणि शालेय बस व रुग्णवाहिकांना अडथळा निर्माण होत आहे.

# रिक्षाने प्रवास करणाऱ्यांनो सावधान!

## मुंबईत मोठा स्कॅम उघड, पोलिसांनी दिला इशारा

**मुंबई** : तुम्ही भाड्याने घेतलेली रिक्षा चोरीची तर नाही ना? हा प्रश्न सध्या मुंबईतील अनेक रिक्षा चालक तसेच मालकांना सतावत आहे. कारण मुंबईत नुकताच एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे, ज्यामुळे रिक्षा प्रवाशांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. कुरार पोलिसांनी एका मोठ्या रिक्षाचोरीच्या रॅकेटचा पदार्फाश केला आहे. चोरी केलेल्या रिक्षांची नंबर प्लेट बदलून त्या भाड्याने चालवणाऱ्या एका रिक्षाचालकासह आणि एका मेकॅनिकला बेड्या ठोकल्या आहेत. हे चोर स्वतःला रिक्षांचे मालक भासवून अनेक प्रवाशांना गंडा घालत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांपासून कुरार परिसरात रिक्षा चोरीच्या घटनांमध्ये अचानक वाढ झाली होती. वारंवार होणाऱ्या या चोरीमुळे पोलिसांना यामागे एक संघटित टोळी असल्याचा संशय आला. या प्रकरणी कुरार पोलिसांनी तात्काळ सूत्रे हलवत, चोरांचा शोध सुरू केला. गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी अथक प्रयत्न केले. अखेर या दोघांना पकडण्यात यश आलं.

**तब्बल सात चोरीच्या रिक्षा जप्त**

या रिक्षाचालक आणि मेकॅनिकला अटक केल्यानंतर पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली. या चौकशीतून धक्कादायक माहिती समोर आली, ज्यामुळे पोलीसही चक्रावले. पोलिसांनी



**पोलिसांनी केले आवाहन**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे (कुरार पोलीस) यांनी याबाबत माहिती देताना सांगितलं की, "सध्या कुरार पोलीस या दोघांशिवाय या रिक्षा चोरीच्या रॅकेटमध्ये आणखी किती जणांचा सहभाग आहे, याचा सखोल तपास करत आहेत. तसेच, आतापर्यंत एकूण किती रिक्षा चोरीला गेल्या आहेत, याबद्दलही अधिक माहिती गोळा केली जात आहे." या अटकेमुळे रिक्षाचोरांना चांगलाच लगाम बसला आहे. मुंबईकरांनी भाड्याने रिक्षा घेताना अधिक सतर्क राहण्याचं आवाहन पोलिसांनी केलं आहे. प्रवाशांनी रिक्षामध्ये बसण्यापूर्वी रिक्षाचा नंबर आणि चालकाची ओळख पटवून घ्यावी, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

त्यांच्याकडून तब्बल सात चोरीच्या रिक्षा जप्त केल्या. हे चोर रिक्षा मिळवल्यानंतर, त्यांची मूळ नंबर प्लेट काढून टाकायचे. त्या जागी बनावट नंबर प्लेट लावायचे. त्यानंतर, या रिक्षा ते इतर सामान्य रिक्षांप्रमाणे भाड्याने द्यायचे आणि त्यातून पैसे कमवायचे. यामुळे प्रवाशांना कळूही शकले नाही की ते चोरीच्या रिक्षामध्ये प्रवास करत आहेत.

## नवे पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी पदभार स्विकारला



**भाईंदर** : मिरा- भाईंदरमध्ये झालेल्या मराठी-अमराठी वादाच्या पार्श्वभूमीवर व्यापारी आणि मराठी संघटनांनी मोर्चा काढला होता.मराठी मोर्चा वेळी पोलिसांनी परवानगी नाकारल्याने मोर्चा चिघळला होता.त्यानंतर मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस ठाण्याचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची बदली करण्यात आली होती.त्यांच्या जागी निकेत कौशिक यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर आता कौशिक यांनी गुरुवारी मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयाचा पोलीस आयुक्त म्हणून पदभार स्विकारला आहे. त्यावेळी मिरा- भाईंदर पोलिसांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपायुक्त संदिप डोईफोडे, अशोक विरकर, प्रकाश गायकवाड, पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सुहास बावचे व इतर पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते. निकेत कौशिक हे यापूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे कार्यरत होते. तर मिरा- भाईंदर महापालिकेत अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांनीही आपला पदभार स्वीकारला आहे. पालिका उपायुक्त डॉ. सचिन बांगर, कल्पिता पिंपळे आणि कविता बोरकर यांच्यासह अधिकारी कर्मचारी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले आहे.

## काँक्रिटचा बनवलेला रस्ता खचल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिकाला ४६.५० लाखांचा दंड

**भाईंदर** : भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक परिसरात आरएनए विकासकाच्या इमारतीचे पायलिंगचे काम सुरू असताना विकासकाच्या निष्काळजीपणामुळे १७ मे रोजी नवीन सिमेंट काँक्रिटचा बनवलेला रस्ता खचला होता. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आता हा रस्ता खचल्याप्रकरणी विकासकाला जबाबदार धरत महापालिका प्रशासनाने ४६ लाख ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही रक्कम महापालिकेच्या नगररचना विभागात जमा करण्यास सांगण्यात आले आहे. मिरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी त्यांच्या आदेशात म्हटले आहे की, बांधकाम व्यावसायिकाला एका महिन्याच्या आत आयआयटी किंवा व्हीआयटीटीआयकडून कामाचा आराखडा आणि तपशील तयार करून एमएमआरडीएकडून मंजुरी घ्यावी लागेल. त्यानुसार, रस्त्याचे बांधकाम एमएमआरडीएच्या देखरेखीखाली पूर्ण करावे लागेल. बांधकाम



अहवालानुसार, सिमेंट काँक्रीटच्या फरशीऐवजी रॅबिट टाकण्यात आले होते. एमएमआरडीएने महापालिकेला पत्र लिहून इशारा दिला होता. भविष्यात रस्ता खराब झाल्यास त्याची दुरुस्ती केली जाणार नाही, असेही स्पष्टपणे नमूद केले होते. तरीही महापालिका अधिकार्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जात आहे. काँग्रेसचे माध्यम प्रमुख दीपक बागडी आणि इतरांनी प्रशासनाकडे निष्काळजीपणामुळे रस्ता खचल्याची आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याची तक्रार केली होती. बागडी म्हणाले की, नियमांनुसार बिल्डरविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल व्हायला हवा होता. तीन महिन्यांत असे आठ अपघात झाले आहेत. परंतु कोणत्याही अधिकार्याला जबाबदार धरण्यात आलेले नाही. तसेच भविष्यात रस्त्याची दुरुस्ती कोण करणार? हे आदेशात स्पष्ट केलेले नाही.

व्यावसायिकाला प्रथम त्याच्या इमारतीचे पायलिंगचे काम पूर्ण करावे लागेल. बांधकाम विभागाकडून यानंतर रस्ते, गटारे आणि पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन टाकण्याचे काम केले जाईल. सर्व काम पूर्ण करण्यासाठी पाच महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. परंतु, भविष्यात रस्ता खराब झाल्यास त्याची दुरुस्ती करण्याची जबाबदारी या आदेशात निश्चित केलेली नाही. महापालिकेने केलेल्या मूल्यांकनात ४ कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे आढळून आले. त्यातील १० टक्के म्हणजेच ४६.५० लाख रुपयांचा दंड बिल्डरला ठोठावण्यात आला आहे. एमएमआरडीएच्या अहवालात बांधकाम व्यावसायिकाने रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याचे उघड झाले आहे.

## खुशबू ठाकरेचे मारेकरी कोण, पेण तहसीलदार कार्यालयासमोर १६ जुलैपासून ठिय्या आंदोलन

**पनवेल** : पेण तालुक्यातील वरवणे आदिवासी आश्रमशाळेत खुशबू ठाकरे या आदिवासी विद्यार्थिनीचा कुष्ठरोगावरील उपचार सुरू असतानाच मृत्यू झाला होता. या घटनेला ६ महिने उलटून गेले तरीही या प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत. त्यामुळे आरोग्य विभागाचा चौकशी अहवाल आणि केमिकल एन्लाईज रिपोर्ट सार्वजनिक करणेबाबत तसेच रिपोर्टची वाट न पाहता तात्काळ दोषींवर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली 16 जुलैपासून बेमुदत ठिय्या आंदोलन केले जाणार आहे.

हे आंदोलन पेण तहसीलदार कार्यालयासमोर केले जाणार आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदार तानाजी शेजाळ आणि खुशबू ठाकरे प्रकरणातील तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नवरखेड यांना देण्यात आले आहे. या आधीच्या अधिवेशनात काँग्रेसचे आमदार हेमंत ओगले यांनी या विषयाला वाचा फोडली होती. मात्र, सरकारने अजून दखल घेतलेली नाही. तर रायगड जिल्ह्यातील आमदार आणि मंत्र्यांनी याबाबत सहा महिन्यांत एकदाही आवाज उठवला नाही.

खुशबू ठाकरे या ९ वर्षीय मुलीच्या जीवाशी खेळणाऱ्यांवर लवकरात लवकर गुन्हे नोंद होऊन आदिवासी कन्येला न्याय देण्याच्या प्रक्रियेत आदिवासी समाजासह इतर समाजातील सर्व घटकांनी, राजकीय तसेच सामाजिक संघटनांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. यावेळी खुशबू ठाकरेचे वडील नामदेव ठाकरे, ग्राम संवर्धन समिती तांबडीचे सदस्य नरेश कडू, पेण खारेपाट विकास संकल्प संघटनेचे सी. आर. म्हात्रे, राजीव गांधी पंचायतीराज संघटनेच्या राष्ट्रीय महासचिव नंदा म्हात्रे, महिला फेडरेशनच्या मोहिनी गोरे, सत्यशोधक चळवळचे संदीप पाटील (गागोदे), आचार्य विनोबा भावे जन्मस्थान प्रतिष्ठानच्या संगीताताई आणि वंदना जाधव आदी उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्त्यांच्या मागण्या

- खुशबू ठाकरेच्या मृत्यूचा चौकशी अहवाल पोलिसांना सादर करून तो सार्वजनिक करावा
- खुशबूचा केमिकल ॲन्लाईज रिपोर्ट पोलिसांना देऊन सार्वजनिक करावा
- दोन्ही अहवाल १६ जुलै २०२५ पूर्वी सादर न झाल्यास खुशबूचे पालक आणि सामाजिक संघटनांच्या तक्रारी निवेदनाच्या आधारावर दोषींवर गुन्हा दाखल करावा
- दोषींची चौकशी, तपास करून पुरावे गोळा करून न्यायालयात आरोपपत्र सादर करावे
- आरोग्य विभागाच्या चौकशी समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी श्रीमती विखे यांचा कोणताही जबाब चौकशीत ग्राह्य धरू नये
- श्रीमती विखे यांच्यासारख्या अधिकारांचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांना पदावरून मुक्त करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा
- खूशबू ठाकरेच्या पालकांना १० लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी
- पेण पोलीस ठाण्याला ठिय्या आंदोलनाचे निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते



**काय आहे प्रकरण?**

खुशबू नामदेव ठाकरे ही पेण तालुक्यातील बोरगाव ग्रामपंचायत हद्दीतील तांबडी आदिवासी वाडीमध्ये राहायची. ती पेण तालुक्यातील वरवणे गावातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत चौथीत शिकत होती. १६ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम अंतर्गत तपासणीत तिच्या अंगावर तीन चट्टे दिसले. त्यावरून ती कुष्ठरोगी असल्याचे निदान करण्यात आले. त्यानंतर 18 डिसेंबरपासून तिच्यावर कुष्ठरोगावरील उपचार सुरू करण्यात आले. मात्र, हे करताना तिच्या पालकांना याबद्दल कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती. खुशबूला कोणताही आजार नसताना कुष्ठरोगाचे उपचार केल्यामुळे तिच्या अंगावर फोड आले, अंगाला सूज आली. तिची तब्येत बिघडली. त्यानंतर वरवणे आश्रमशाळेकडून तिच्या वडिलांना बोलावून घेण्यात आले. तिच्या वडिलांनी खुशबूला कामोठेमधील एमजीएम रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना २२ जानेवारी २०२५ रोजी तिचा मृत्यू झाला. चुकीचे औषधोपचार केल्यामुळे खुशबू ठाकरे हिचा मृत्यू झाला.

## मौजमजेची हौस, पुण्यात ४ तरुणांनी केलं असं काही की...

# सीसीटीव्हीमुळे धक्कादायक प्रकार उघड




**कसून चौकशी सुरु**

सुजल राजन परदेशी (वय २०), सुभाष राजेश सरोज (वय २१), नितीन दिलीप सरोज (वय २२) आणि रोहित मुन्नालाल सरोज (वय २२) अशी या चार आरोपींची नाव आहे.पोलिसांनी या चौघांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांची कसून चौकशी केली. त्यावेळी त्यांनी मौजमजेसाठीच ही चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून चोरी केलेली रक्कम आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेले हत्यार जप्त केले आहे. त्यांना दाखल गुन्ह्यात अटक केली आहे. त्यांच्यावर गु. र.नं १५०/२०२५ भा.न्या.सं.क.३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पुणे** : मौजमजेच्या नावाखाली घरफोड्या करून दहशत निर्माण करणाऱ्या चोरट्यांच्या टोळीला पुणे पोलिसांनी अवघ्या ४ तासांत गजाआड केले आहे. पुणे शहरातील समर्थ पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी ही धडाकेबाज कारवाई केली आहे. या कारवाईमुळे व्यापारी वर्गाने सुटकेचा निःश्वास टाकला आहे. सुजल राजन परदेशी (वय २०), सुभाष राजेश सरोज (वय २१), नितीन दिलीप सरोज (वय २२) आणि रोहित मुन्नालाल सरोज (वय २२) अशी या चार आरोपींची नाव आहे. या सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**नेमकं काय घडलं?**

शनिवारी ५ जुलै २०२५ ला रात्री आणि ६ जुलै २०२५ च्या पहाटेच्या सुमारास नाना पेठ येथील शार्प कलर दुकानाचे शटर वाकवून, ते उचकटून आणि कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. यानंतर दुकानातील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले १५,५०० रुपये त्यांनी लंपास केले होते. या प्रकरणी समर्थ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला. हा गुन्हा दाखल होताच, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तपास पथकाने तात्काळ सूत्रे हलवली. पोलीस अंमलदार अमोल गावडे आणि इम्रान शेख यांनी घटनास्थळाची पाहणी करत आजूबाजूच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची कसून तपासणी केली. त्याचबरोबर, गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे चोरी करणाऱ्या अज्ञात चोरट्यांचा युद्धपातळीवर शोध सुरू करण्यात आला. पोलिसांच्या अथक प्रयत्नांना यश आले. त्यांनी अवघ्या चार तासांत या चोरट्यांना मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com